# महाराष्ट्र शासन

## विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल

शासकीय अध्यापक महाविद्यालय परिसर, पनवेल, जि-रायगड -४१०२०६

ईमेल पत्ता: jtdire.१११५@gmail.com Website: http://jdhepanvel.org दूरध्वनी क्रमांक ०२२-२७४६१४२०

जा.क्र.विससं/उशि/कोविप/वेतनपथक/तासिका मानधन/२०२५-२६/ 681 दिनांक :०८/०९/२०२५

प्रति,
प्राचार्य
सर्व अधिनस्त अशासकीय अनुदानित कला,वाणिज्य,विज्ञान
विधी व शिक्षणशास्त्रे महाविद्यालये.
जिल्हा:- ठाणे,पालघर,रायगड,रत्नागिरी व सिंधुदूर्ग.

**विषय:- तासिका तत्वावरील अध्यापकांच्या मानधन अदायगी बाबत ...**

संदर्भ:- १. उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२१/प्र.क्र.१८१/२१/विशी-१, दि.१७.१०.२०२२
२. उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्र.अर्थसं-२०२२/प्र.क्र.१०५/(१)/मशि-३, दि.२७.०३.२०२३
३. प्रस्तूत कार्यालयाचे पत्र क्र.विससं/उशि/कोविप/सीएचबी/२०२४-२५, दि,२५.१०.२०२४
४. शिक्षण संचालनालय पुणे, यांचे पत्र क्र. उशिसं/२०२५/सीएचबी/मवि-१/E-Comp.No.२११६४४८, दि.३०.०८.२०२५

उपरोक्त संदर्भिय शासन निर्णय क्र.१ अन्वये तासिका तत्वावरील अध्यापकांच्या नेमणूकी संदर्भात कार्यपध्दती विहीत करण्यात आली असून संदर्भिय शासन निर्णय क्र. २ अन्वये तासिका तत्वावरील अध्यापकांना अदा करावयाच्या मानधनाचे दर निश्चित करण्यात आले आहेत. सदरहू शासन निर्णयाद्वारे तासिका तत्वावरील अध्यापकांच्या मानधनाची मागणी प्रस्तूत कार्यालयास प्रत्येक वर्षी सादर करण्याबाबत संदर्भिय पत्र क्र. ३ अन्वये आपणांस यापुर्वी सुचित करण्यात आले असतांना सुध्दा सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील तासिका तत्वावरील अध्यापकांच्या मानधनाची मागणी प्रस्तूत कार्यालयास आजतागयात नोंदविण्यात आलेली नाही. सदरची बाब ही अत्यंत गंभीर स्वरुपाची असून तात्काळ विद्यापीठ मान्यताप्राप्त तासिका तत्वावरील अध्यापकांच्या मानधनाची मागणी प्रस्तूत कार्यालयाकडे विनाविलंब नोंदविण्यात यावी.

**विद्यापीठ मान्यता उशिरा प्राप्त झाल्याने मागील (सन २०२४-२५) शैक्षणिक वर्षातील प्रलंबित राहिलेली मानधनाची मागणी स्वतंत्र प्रस्तावामध्ये सादर करण्यात यावी. तसेच जून-२०२५ ते ऑगस्ट,२०२५ पर्यंतची मागणी दि. १० सप्टेंबर, २०२५ पर्यंत तात्काळ सादर करण्यात यावी. यानंतर तासिका तत्वावरील अध्यापकांच्या मानधनाची नियमित मागणी पुढील प्रत्येक महिनाच्या १० तारखेपर्यंत विनाविलंब प्रस्तूत कार्यालयाकडे नोंदविण्यात यावी. सदर देयके सादर करण्यास विलंब झाल्यास प्राचार्य हे व्यक्तीश: जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी.**

(डॉ.किरणकुमार बोंदर)
विभागीय सहसंचालक
उच्च शिक्षण,कोकण विभाग,पनवेल

प्रत : १. मा. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर.
२.मा. कुलसचिव, मुंबई विद्यापीठ , मुंबई यांना सुचित करण्यात येते की, विद्यापीठ स्तरावर प्रलंबित असलेले तासिका तत्वावरील अध्यापकांच्या नियुक्तीस विद्यापीठ मान्यता मिळणेबाबतचे प्रस्तावास निकाली काढण्याबाबतची कार्यवाही तात्काळ करण्यात यावी.